पुण्य नगरी

# प्रतिभा कॉलेजला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार

**पिंपरी :** चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी चे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज व क्विल हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा जनजागृतीचा उपक्रम गेले दोन वर्षापासून राबविण्यात येत आहे.



या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा बाबत प्रशिक्षण देण्यात आले.त्यात प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षे करिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांनी स्वीकारला. तसेच शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छांनी, प्रा सुप्रिया गायकवाड, प्रा उज्वला फलक सर्वोत्कृष्ट राष्ट्रपती विजेता पुरस्कार विद्यार्थी दिपू सिंग , सर्वोत्कृष्ट पी आर मीडिया डायरेक्टर फर्स्ट विद्यार्थिनी बतुल परवाला. सर्वोत्कृष्ट सायबर वॉरियर्स पहिली धावपटू विद्यार्थिनी श्रावणी सावंत ,ओम जगताप यांनाही राज्यपाल सी .पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही विद्यमान मालक श्री. पवन सुभाष कांबळे, संपत लक्ष्मण अडसुरे यांचे खरेदी मालकी ताबे वहिवाटीची अशी आहे. त्यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल (१) सौ. स्वाती गजानन जाधव (२) सौ. कल्पना संतोष राऊत, दोघे रा. आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे ४१२१०५ यांना विक्री करण्याचे ठरवुन तसा खरेदीखताचा व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहित असल्याचा भरवसा व खात्री दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ (आठ) दिवसांचे आत पुराव्याचे कागदपत्रासह आमची खात्री पटवुन द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहेत असे समजून ज्या कोणाचा काही हक्क, हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेला व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट मिळकत :** गाव मौजे चऱ्होली बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्वे नंबर ३८९ क्षेत्र ०५ हे. २५ आर अधिक पो.ख. ०३ हे. २९ आर यांसी आकार ६ रु. २५ पैसे पैकी यापैकी स्व- खरेदी मालकी ताबे वहिवाटीची क्षेत्र ०० हे. ०३ आर यांसी आकार ००रु.०४ पैसे येणेप्रमाणे यांसी चतुःसीमा- पूर्वेस :- श्री. दत्ता माणिकराव पांचाळ यांची मिळकत, दक्षिणेस :- श्री. सदाशिव गेनोजी नेहेरे यांची मिळकत, पश्चिमेस :- श्री. रामदास पंडित काळजे व श्री. विकास पंडित काळजे यांची मिळकत, उत्तरेस :- १५ फुटी रस्ता.

येणेप्रमाणे मिळकत हा या नोटिसीचा विषय आहे.

**आमचे अशीलांतर्फे**

दि. २३/०१/२०२५

सही/-

**ॲड. निलेश भारत वेताळ**

ऑफिस नं. ३, तुळजाभवानी माता मंदिराजवळ, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे ४१२१०५, मोबा नं. ८९९९१७००२०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गाव मौजे, वारुळवाडी, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे व आसपासचे परीसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशीष्टात वर्णन केलेली सदनिका ही मनोज शिवाजी हिंगे यांच्या मालकी वहिवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरोसा आमचे अशिलांना दिलेला आहे व खालील वर्णनाची सदनिका त्यांनी आर्थिक अडचणीपोटी आमचे अशिलांना खरेदी देण्याचे निश्चित करून त्यासंबंधी बोलणीही सुरू केलेली आहे. त्यानुषंगाने त्यांनी आमचे अशिलांना इसारपावती देखील करून दिलेली आहे.

तरी खाली वर्णन केलेल्या मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लिज, बक्षीस, खरेदी-विक्री, साठेखत, लिज-लिन, चोळी बांगडी, वाटप, पोटगी, रिझर्व्हेशन व खालील मिळकतीसंदर्भात इतर कोणतेही करार वा ॲग्रीमेंट केलेले असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दहा दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन, सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील. मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून हेतुपुरस्सर सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोटतुकडी ता. जुन्नर, मे. सह. दु. निबंधक नारायणगाव यांचे कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा परिषद पुणे व तालुका पंचायत समिती जुन्नर यांचे हद्दीतील ग्रामपंचायत वारुळवाडी यांचे अधिकारातील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत गट नं. ६६३/३ ब यांसी क्षेत्र ० हे ५३ आर, आकार १ रु.०० पैसे यांवर बांधकाम केलेला गृहप्रकल्प शुभसंपदा - १ यामधील सदनिका क्र- बी - १०, तिसरा मजला, यासी ग्रामपंचायत मिळकत नं. २७१४ (जुना नं. २५९८), एकुण क्षेत्रफळ ६२० चौ. फुट यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे- पुर्व- सदनिका क्र. ९, पश्चिम - ए - ११ व डक्ट, दक्षिण- जिना, उत्तर - मोकळी जागा.

येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक मिळकतींचे वर्णन, त्यातील झाडेझुडपे व तदंगभुत वस्तुंसह व जाण्यायेण्याच्या व वहिवाटीच्या हक्कांसह असे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सही/-

दि. २३/०१/२०२५

**ॲड. महावीर व्ही. चोरडीया**

पहिला मजला, मिनी मार्केट, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०४. मो. नं. ९८६०५८६४८०